लोकमत

# अवैधरीत्या पैसे, दारु वाहतुकीवर कारवाई करा

## जिल्हाधिकारी : कार्यवाही गतिमान करावी

लोकमत न्यूज नेटवर्क

अहमदनगर : लोकसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघात नियुक्त केलेल्या एसएसटी (स्टॅटिक सर्वेलन्स) पथकांनी जिल्ह्यातून बाहेर जाणाऱ्या रस्त्यांवर, महामार्ग तसेच जिल्ह्यांतर्गत विविध महत्वाच्या मार्गावर काटेकोर तपासणी करावी. कोणत्याही प्रकारे अवैध दारु, बेकायदेशीररीत्या पैशांची वाहतूक होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल द्विवेदी यांनी दिले.

शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात या पथकांतील नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांची बैठक झाली. यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा शिर्डी मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पिराजी सोरमारे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक पराग नवलकर, निवासी उपजिल्हाधिकारी प्रशांत पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पाटील, कोषागार अधिकारी महेश घोडके, तहसीलदार हेमा बडे आदी उपस्थित होते.

प्रत्येक मार्गावरील संशयास्पद वाहनांची तपासणी करा, विनाकागदपत्रे होणारी पैशांची वाहतूक, इतर अवैध गोष्टींची वाहतूक यावर या पथकांनी कडक लक्ष देणे आवश्यक आहे.

याशिवाय अनधिकृत प्रचारपत्रके, प्रचारसाहित्य यांची वाहतूक होत असेल, ते जप्त करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कोणत्याही व्यक्तींकडे ५० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम आढळून आल्यास तात्काळ ती ताब्यात घेऊन खर्च नियंत्रण कक्षाला कळवा. संबंधित व्यक्तींकडे सदर रकमेबाबतचे कागदपत्रे तपासा, असे त्यांनी सांगितले. सध्या जिल्ह्यात ३६ स्थिर तपासणी व निरीक्षण पथके कार्यरत असून गरज पडल्यास ती अधिक वाढवण्यात येतील, असे द्विवेदी यांनी स्पष्ट केले.

# 'सी व्हिजिल'वर तक्रारी, सेल्फीही

नगर : लोकसभा निवडणुकीतील आचारसंहिताभंगाच्या तक्रारी तातडीने सोडविण्यासाठी निवडणूक आयोगाने मतदारांसाठी 'सी व्हिजिल' हे जीपीएस प्रणाली असलेले मोबाइल ॲप्लिकेशन उपलब्ध करून दिले आहे, त्याला प्रतिसाद मिळत आहे. परंतु, काही वेळा तथ्य नसलेल्या तक्रारी येत आहेत. एका तरुणाने स्वतःच्या सेल्फी टाकला होता. तर एका गाडीमध्ये पाच लाख रुपये व पिस्तूल असल्याची तक्रार आली होती. परंतु, फोटो टाकलेल्या कारला क्रमांकच नव्हता. या व्यतिरिक्त तथ्य असलेल्या पोस्टरबाबत तक्रारी येत आहेत.

लोकसभा निवडणुकीत ऑनलाइन स्मार्ट ॲप्लिकेशनचा आधार घेण्यात येत आहे. यंदा प्रथमच 'सी व्हिजिल' हे जीपीएस प्रणालीवर आधारित मोबाइल ॲप्लिकेशन मतदारांना उपलब्ध झाले आहे. मतदारांकडून येणाऱ्या तक्रारी पाहण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक कक्ष तयार करण्यात आलेला आहे. दहा कर्मचारी दिवस-रात्र या तक्रारींवर लक्ष ठेवून आहेत. या ॲपवर येणाऱ्या तक्रारींची खातरजमा करून १०० मिनिटांत त्या तक्रारींवर पथकाने कारवाई करायची आहे. या पथकात पोलिस, महसूल व इतर विभागाचे कर्मचारी आहेत. लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ५० पथके नियुक्त करण्यात आलेले आहे. तक्रार आल्यानंतर हे पथक जीपीएस लोकेशनच्या ठिकाणी जाऊन कारवाई करत आहे. नगर जिल्ह्यात आतापर्यंत ३३ तक्रारी आल्या आहेत. त्यात १७ तक्रारींमध्ये तथ्य आढळून आले आहे. त्या तक्रारी राजकीय व्यक्तींचे पोस्टर, बॅनरबाबत करण्यात आल्या आहेत. पथकांनी जाऊन हे पोस्टर हटवून कारवाई केली आहे. तर १६ तक्रारींमध्ये तथ्य आढळून आले नाही. त्यात एका तरुणाने स्वतःचा सेल्फी टाकला होता. तर काही जणांनी ॲप चालते की नाही हे तपासून पाहिले आहे.

## हेल्पलाइनवर सव्वा दोन हजार कॉल

मतदारांच्या मदतीसाठी निवडणूक आयोगाने १९५० हेल्पलाइन क्रमांकाची सोय उपलब्ध करून दिली आहे. त्याचा एक कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू करण्यात आला आहे. हेल्पलाइन्ससाठी तीन लाइन्स आहेत. हेल्पलाइन सुरू झाल्यापासून दहा दिवसांत २ हजार ३०० नागरिकांनी हेल्पलाइनवर संपर्क साधून मतदार यादीतील नाव, मतदानासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबत माहिती विचारून घेतली आहे. त्यात अनेक जणांनी केवळ हेल्पलाइन सुरू आहे का हे विचारण्यासाठी हेल्पलाइनवर संपर्क साधला आहे.

# दोन हजार जणांवर प्रतिबंधक कारवाई

## संबंधितांना बजावल्या नोटिसा

म. टा. वृत्तसेवा, जामखेड

जामखेड तालुक्यात मागील काळात झालेले राजकीय वाद, हाणामाऱ्या, शस्त्राचा वापर, निवडणुकीच्या काळात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असणाऱ्या तालुक्यातील एकूण १९६० जणांवर जामखेड पोलिस स्टेशनअंतर्गत प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. याबाबतच्या नोटिसा संबंधितांना पोलिस निरीक्षक पांडुरंग पवार यांनी बजाविल्यामुळे गुन्हेगारी क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

जामखेड तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय, कर्जत तसेच एलसीबी यांच्याकडे या कारवाईच्या पूर्ततेसाठी अनेकांची धावपळ सुरू झाली आहे. याबाबत बजाविण्यात आलेल्या नोटिसांमध्ये म्हटले आहे की, सामनेवाला हा अतिशय अडदांड प्रवृत्तीचा असून त्याच्या हातून भविष्यात एखादा मोठ्या स्वरूपाचा दखलपात्र स्वरूपाचा गुन्हा अगर जातीय तणाव घडण्याची शक्यता आहे.

सध्या पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात लोकसभा निवडणुका पार पडण्यात येणार असून त्यासाठी निवडणूक आयोग आदर्श आचारसंहिता राबविणार आहे. निवडणुकीच्या काळात पोलिस यंत्रणा कायदा आणि सुव्यवस्था बंदोबस्तात व्यग्र असण्याचा फायदा घेऊन सामनेवाला हा स्वतः अगर त्याच्या हस्तकांमार्फत निवडणुकीत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यास बाधा निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहून निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी आणि निवडणुकीत सामनेवाला यांच्याकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये व सर्वसामान्य नागरिकांच्या मालमत्ता व जिवीतांचे नुकसान होऊ नये यासाठी सामनेवाला यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी. अशा नोटिसा तालुक्यातील १९६० जणांना पोलिस निरीक्षक पांडुरंग पवार यांनी बजाविल्या.

# मतदान जागृतीसाठी पालकांचे संकल्पपत्र

नगर : यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांत मतदानाबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. या उपक्रमात आता शाळेतील विद्यार्थी व त्यांच्या पालकांनाही सहभागी करून घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांतील विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे संकल्पपत्र भरून घेण्यात येणार आहे. याबाबत जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने सूचना दिल्या आहेत.



या उपक्रमात जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील जवळपास नऊ लाख विद्यार्थी त्यांच्या पालकांकडून मतदान करण्याबाबत १८ लाख संकल्पपत्रे भरून घेणार आहेत. लोकसभा निवडणुकीत नागरिकांना मतदानाबाबत माहिती देण्यात येत आहे. जिल्हाभरात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. मतदारांना निवडणूक प्रक्रियेबाबत माहिती देण्यात येत आहे. या उपक्रमात विद्यार्थी त्यांच्या पालकांचे संकल्पपत्र लिहून घेणार आहेत. यासाठी संकल्पपत्र तयार करण्यात आली आहेत. त्यांचे वितरण करण्यात येणार आहे. या संकल्पपत्रांत पालकांनी मतदान करण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. त्यानंतर या संकल्पपत्रांचे संकलन करून शाळा स्तरावर ठेवण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांना याबाबत सूचना दिल्या आहेत.

# मतदार जनजागृतीसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

## निवडणूक आयोगाची स्विप-२ मोहीम : जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचा पुढाकार

**नगर, दि. २९ (प्रतिनिधी)** - निवडणूक आयोगाच्या स्विप-२ मोहिमेसाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातर्फे लोकशाही उत्सवाचे आयोजन करण्यात आली आहे. मतदार जनजागृतीसाठी अणि मतदानामध्ये प्रत्यक्ष सहभागी होण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल द्विवेदी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

निबंध, चित्रकला, घोषवाक्य, पोस्टर, मतदान प्रबोधनात्मक चित्रफित (व्हिडीओ), लघुपट निर्मिती स्पर्धा घेण्यात येणार आहे. मतदार जनजागृती उपक्रम राबवणाऱ्या व्यक्ती, संस्थां, शाळा, महाविद्यालये यांना देखील पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत.

एकूण चार गटात या स्पर्धा होणार आहे. पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी, अकरावी ते पदवीधर आणि खुला, असे हे चार गट असतील. निबंध स्पर्धांचे विषय पुढीलप्रमाणे : मतदान-एक राष्ट्रीय कर्तव्य, लोकशाही आणि मतदानाचा हक्क, चला मतदानाला, मतदार राजा जागा हो आणि माझे आई-वडील मतदानाला जाणारच, असे असतील.

### निबंध, चित्रकला, घोषवाक्य लघुपट निर्मितीच्या स्पर्धा घेणार

घोषवाक्य स्पर्धेसाठी विषय : मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो. चित्रकला व पोस्टर स्पर्धे साठी विषय : मतदान केंद्र-भारताचे शक्तिस्थान, मतदार जनजागृती, मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो. वरीलपैकी कुठल्याही एक विषयावर व्हिडिओ व लघुपट निर्मिती करावयाची आहे. व्यक्ती व संस्थांनी मतदान जनजागृतीसाठी केलेल्या कामाचा अहवाल प्रस्ताव स्वरूपामध्ये वृत्तपत्र कात्रणे, छायाचित्रे, प्रमाणपत्रे, विविध स्पर्धा व उपक्रमांचा तपशील याद्या जोडून सर्व प्रस्ताव, निबंध, चित्र, घोषवाक्ये, पोस्टर आदी साहित्य २० एप्रिलपर्यंत जिल्हा परिषद, माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभाग, अहमदनगर या ठिकाणी जमा करावयाचे आहे. विजेत्या स्पर्धकांना उत्कृष्ट पारितोषिके व शासनाचे प्रमाणपत्र प्रदान केले जाणार आहे.

स्पर्धकांनी या लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान विषयक जनजागृती करावी व मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम, तहसीलदार हेमा बडे,शिक्षणाधिकारी रमाकांत काटमोरे (प्राथमिक), शिक्षणाधिकारी लक्ष्मण पोले (माध्यमिक) आदींनी केले आहे.

प्रभात
Sat, 30 March 2019
epaper.eprabhat.net/c/38059466